।। सा विद्या या विमुक्तये ।।

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपुरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED

"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)

Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

Office of the Controller of Examinations

Phone: (02462)229294 website: srtmun.ac.in E-mail: srtmuncoe@gmail.com

FAX No: (02462) 229520

जा.क्र.संचालकपमुमं/उत्तरपुस्तीका/परिपत्रक/२०१६-१७/1943 दिनांक : १४/०३/२०१७.

**अतितात्काळ/महत्वाचे**

प्रति,

**मा. प्राचार्य तथा केंद्र प्रमुख**

उन्हाळी २०१७ सर्व परीक्षा केंद्र

प्रस्तुत विद्यापीठ.

विषय : **उन्हाळी २०१७ परीक्षांसाठी उत्तरपुस्तीकांच्या वापराबाबत.**

संदर्भ : दि. ०८/०३/२०१७ रोजी संपन्न झालेल्या परीक्षा व मुल्यमापन मंडळाच्या बैठकीतील ठराव.

महोदय,

उपरोक्त विषयी आपणास कळविण्यात येते की, प्रस्तुत विद्यापीठाच्या उन्हाळी २०१७ पदवी अभ्यासक्रमाच्या परीक्षा दि. १५ मार्च २०१७ पासुन तर पदव्युत्तर परीक्षा दि. ११ एप्रिल २०१७ पासुन सुरू होत असुन त्यासाठी आवश्यक असलेल्या २० पानी उत्तरपुस्तीका + OMR Sheet सह, २० पानी उत्तरपुस्तीका, २४ पानी उत्तरपुस्तीका, ३२ पानी उत्तरपुस्तीका अशा एकुण चारही प्रकारच्या उत्तरपुस्तीका पुरवठा करण्यात आलेल्या आहेत. या उत्तरपुस्तीका दि. ०८/०३/२०१७ रोजी संपन्न झालेल्या परीक्षा व मुल्यमापन मंडळाच्या बैठकीतील ठरावानुसार खालीलप्रमाणे वापर कराव्यात.

१. **२० पानी बारकोड ( OMR Sheet सह) उत्तरपुस्तीकांचा वापर :** BA, B.Com, B.Sc व BBA या अभ्यासक्रमाच्या प्रथम व व्दितीय वर्ष थेअरी आणि एम.सी.क्यू पध्दतीच्या परीक्षांसाठी या उत्तरपुस्तीका वापरण्यात याव्यात. ज्यामध्ये एम.सी.क्यू साठी OMR sheet देण्यात येत आहेत. यासाठी परीक्षा केंद्र प्रमुखांनी एकच उपस्थिती अहवाल (फॉर्म नं.०१) वापरावा. तसेच विद्यापीठाच्या प्रचलित नियमानुसार वरील अभ्यासक्रमाच्या MCQ प्रश्नांसाठी केवळ सुरुवातीचा अर्धा तास देण्यात आलेला असुन तो अर्धा तास संपल्यानंतर MCQ Sheet संबंधीत पर्यवेक्षकांनी त्या उत्तरपुस्तीकेतुन वेगळी करुन घ्यावी व ती लगेच एका वेगळया पाकीटात तात्पुरते सिलबंद करावे व परीक्षा संपल्यानंतर केंद्रप्रमुखांनी उपस्थिती अहवालाची एक छायांकीत प्रत काढुन या OMR sheet उपस्थिती अहवालासह सिलबंद करुन केंद्रीय मुल्यांकन केंद्र प्रस्तुत विद्यापीठात पाठविण्यासाठी तयार ठेवावेत.

२. **२० पानी बारकोड उत्तरपुस्तीकांचा वापर :** ज्या अभ्यासक्रमासाठी केवळ थेअरी पॅटर्न आहे व ४० गुणांची प्रश्नपत्रिका असेल त्या सर्व अभ्यासक्रमाच्या परीक्षेसाठी २० पानाची (OMRSheet) नसलेली Barcode ची उत्तरपुस्तीका वापरण्यात यावी.

३. **<u>२४ पानी बारकोड उत्तरपुस्तीकांचा वापर :</u>** BA, B.Com, B.Sc व BBA या अभ्यासक्रमाच्या थेअरी+एम.सी.क्यू या पॅटर्नच्या तृतीय वर्षासाठी २४ पानी बारकोड उत्तरपुस्तीाकांचा वापर करण्यात यावा.

४. **<u>३२ पानी Barcode उत्तरपुस्तीकांचा वापर :</u>** ज्या अभ्यासक्रमाच्या प्रश्नपत्रिका ५० गुण व त्यापेक्षा अधिक असतील तर अशा पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षेसाठी ३२ पानी उत्तरपुस्तीकांचा वापर करण्यात यावा.

५. परीक्षार्थीना उत्तरपुस्तीकाा वितरीत करण्यापुर्वी त्यावर बारकोड, अनुक्रमांक असल्याची तसेच उत्तरपुस्तीकेतील सर्व पेजेस सुस्थीतीत असल्याची खात्री पर्यवेक्षकांनी करावी. उत्तरपुस्तीकेतील पेजेस कमी असल्याचे आढळुन आल्यास ती उत्तरपुस्तीका वापरु नयेत.

६. कुठल्याही परिस्थीतीत परीक्षार्थीना पुरवणी देण्यात येवु नये तसेच पुरवणी देण्याबाबत विद्यापीठास संपर्क करु नये.

७. परीक्षा केंद्रास आवश्यक असणा-या उत्तरपुस्तीका व इतर स्टेशनरीची मागणी किमान तीन दिवस अगोदर उपकुलसचिव (परीक्षा विभाग) यांचेकडे करावी. यासाठी भ्रमनध्वनी खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

८. आपल्या परीक्षा केंद्रावर बारकोडच्या २० पानी,३२पानी उत्तरपुस्तीकांचा जुना साठा उपलब्ध असल्यास त्या केवळ थेअरी अभ्यासक्रमाच्या परीक्षेसाठी वापरण्यास मुभा देण्यात येत आहे. तसेच BA, B.Com, B.Sc, BBA या थेअरी + एम.सी.क्यू पॅटर्नच्या अभ्यासक्रमासाठी वरील अनुक्रमांक ०१ नुसार नमूद केल्याप्रमाणे २० पानी उत्तरपुस्तीका OMR sheet देण्यात आलेले आहेत तेच वापरणे अनिवार्य राहील. जुन्या OMR sheet वापरु नयेत.

सबब, वरीलप्रमाणे उत्तरपुस्तीकांचा वापर काटेकोरपणे होईल याची दक्षता संबंधीत केंद्र प्रमुखांनी घ्यावी व हि बाब परीक्षा केंद्रावरील सर्व पर्यवेक्षक व परीक्षेत कार्य करणा-या शिक्षक /शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या निदर्शनास आणुन दयावी व परीक्षा सुरळीत पार पाडण्यास सहकार्य करावे.

कळावे,

आपला,

**संचालक**
परीक्षा व मुल्यमापन मंडळ